# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

## व्यवस्थापन परिषदेच्या १८४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि. १० सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी ११:३० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १८४ वी बैठक (तातडीची) **मंगळवार, दि.१० सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी ११:३० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे प्रत्यक्ष व Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे ऑनलाईन अशा दोन्ही पध्दतीने मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस प्रत्यक्ष व ऑनलाईन पध्दतीने उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य | उपस्थित |
| ७) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ९) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १०) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १३) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १५) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १६) | डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | प्रा. (डॉ.) विकास भाऊराव घुटे, प्र. वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| १९) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २०) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस डॉ. अजित माधव पाटणकर यांनी दूरध्वनीद्वारे/ईमेलद्वारे अनुपस्थिती कळविली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ०१ ]</td><td>दि.१६ ऑगस्ट, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८३ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ.</td><td rowspan="2">सभा व निवडणूका विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>दि.१६ ऑगस्ट, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८३ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td></tr>
<tr><td></td><td>पान क्रमांक ३ येथील दि.१९ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांतामध्ये दुरुस्ती केलेल्या ठरावामध्ये पुनश्च: खालीलप्रमाणे सर्वानुमते दुरुस्ती करण्यात आली. (दि.१३ जून, २०२४ रोजीच्या बैठकीत विषय क्र.१५)<br>
पूर्वीचा ठराव<br>
डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर, अधिसभा सदस्य यांनी दि.२८/०२/२०२४ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत सादर केलेल्या ठराव क्र.१६ नुसार अधिसभेने केलेली शिफारस खालील दुरुस्तीसह स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>
सदरची वाढ ही दि.२०/०७/२०२४ पासून विद्यापीठाच्या विविध कार्यालयीन कामासाठी येणाऱ्या / जाणाऱ्या शिक्षक, अधिकारी / कर्मचारी / विविध अधिकार मंडळांचे सदस्य यांना लागू राहील.
<table>
<tr><th>पेट्रोल</th><th>डिझेल / सीएनजी / इलेक्ट्रिकल</th><th>विशेष भत्ता</th></tr>
<tr><td>रु.१३/</td><td>रु.१२/-</td><td>रु.४००/-</td></tr>
</table>
तसेच उपरोक्त संदर्भात यापूर्वी झालेले सर्व ठराव दि.२०/०७/२०२४ पासून सर्वानुमते रद्द करण्यात यावेत असे ठरले.<br>
दुरुस्त केलेला ठराव<br>
डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर, अधिसभा सदस्य यांनी दि.२८/०२/२०२४ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत सादर केलेल्या ठराव क्र.१६ नुसार अधिसभेने केलेली शिफारस खालील दुरुस्तीसह स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>
विशेष भत्ता पूर्वी प्रमाणेच ठेवण्यात आला असून पेट्रोल आणि डिझेल / सीएनजी / इलेक्ट्रिकल बाबतची वाढ ही दि.२०/०७/२०२४ पासून विद्यापीठाच्या विविध कार्यालयीन कामासाठी येणारे / जाणारे शिक्षक, विविध अधिकार मंडळांचे सदस्य यांना लागू राहील.
<table>
<tr><th>पेट्रोल</th><th>डिझेल / सीएनजी / इलेक्ट्रिकल</th></tr>
<tr><td>रु.१३/</td><td>रु.१२/-</td></tr>
</table>
तसेच उपरोक्त संदर्भात यापूर्वी झालेले सर्व ठराव दि.२०/०७/२०२४ पासून सर्वानुमते रद्द करण्यात यावेत असे ठरले.</td><td>वित्त व लेखा विभाग</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | • पान क्र.१४ येथील विषय क्र.११ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| | पूर्वीचा ठराव | |
| | सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत सविस्तर माहितीसह पुन:श्च सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. | |
| | **दुरुस्त केलेला ठराव** | |
| | **प्रस्तुत विद्यापीठाच्या परीक्षा शुल्कामध्ये सन २०२४-२५ पासून १०% वाढ करण्याबाबत दि.२९/०७/२०२४ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |
| | • पान क्र.१५ येथील विषय क्र.१२ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | विद्यार्थी विकास विभाग |
| | पूर्वीचा ठराव | |
| | विद्यापीठ संकुलामध्ये सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून नियतकालिका स्पर्धा सुरु करण्यास व महाविद्यालयाच्या वार्षिक नियतकालिकेचे शुल्क लागू करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | **दुरुस्त केलेला ठराव** | |
| | **विद्यापीठ संकुलामध्ये सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून नियतकालिका स्पर्धा सुरु करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | **गरीब, हुशार व होतकरु विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी श्री. डी. राम रेड्डी, सोलापूर यांच्याकडून देण्यात आलेली रक्कम विद्यापीठात जमा करुन घेण्याबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मा.कुलगुरुमहोदय यांच्याकडून करण्यात आलेली कार्यवाही माहितीस्तव.**<br>टिपणी: श्री. डी. राम रेड्डी सोलापूर यांचे दि.०१/०८/२०२४ रोजीच्या पत्रान्वये धनादेश क्र.०००४८५, दि.०१/०८/२०२४ अन्वये रु.१,०२,०००/- इतकी रक्कम सुपूर्द करुन सदर रक्कम गरीब, हुशार व होतकरु विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी खर्च करण्याबाबत विनंती केली आहे. तरी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम (ट) अन्वये सदरचे अधिकार व्यवस्थापन परिषदेस असून व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने रु.१,०२,०००/- रक्कम विद्यापीठाकडे जमा करुन घेणे आवश्यक होते. परंतू आगामी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीची तारीख निश्चित नसल्यामुळे धनादेशाची तारीख विचारात घेता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मा.कुलगुरुमहोदय यांच्या मान्यतेने सदरची रक्कम वित्त व लेखा विभागात पावती क्र.७७२१, दि.१४/०८/२०२४ अन्वये जमा करुन घेण्यात आली आहे.<br>सबब, श्री. डी. राम रेड्डी सोलापूर यांच्याकडून देण्यात आलेली रक्कम विद्यापीठात जमा करुन घेण्याबाबत मा.कुलगुरुमहोदय यांच्याकडून करण्यात आलेली कार्यवाही माहितीस्तव. | विद्यार्थी विकास विभाग |
| ठराव: | **गरीब, हुशार व होतकरु विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी श्री. डी. राम रेड्डी, सोलापूर यांच्याकडून देण्यात आलेली रक्कम विद्यापीठात जमा करुन घेण्याबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा.कुलगुरुमहोदय यांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०३ ] | **ड्रिम कॉम्प्युटर, कोल्हापूर कंपनीकडून घेण्यात येणाऱ्या sus.ac.in या संकेतस्थळासाठी Annual Maintenance Charges (A.M.C.) बाबत करण्यात आलेल्या कराराची व देयक अदा केल्याबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मा.कुलगुरुमहोदय यांच्याकडून करण्यात आलेली कार्यवाही माहितीस्तव.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाचे संकेतस्थळ http://www.sus.ac.in/ साठी ड्रिम कॉम्प्युटर, कोल्हापूर यांच्याकडून सेवा घेण्यात येत आहे. (Design & Development). तसेच संकेतस्थळाचा Source Code & Database हा त्यांच्याकडे असून विद्यापीठाचे संकेतस्थळ हे दररोज Update होत आहे.<br>सदर फर्मकडून घेण्यात आलेल्या ०५ August २०२३ to ०४ August, २०२४ सेवेचा वार्षिक करार दि.०५ ऑगस्ट, २०२४ रोजी संपलेला असून संकेतस्थळ Design & Development साठी (A.M.C.) पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी सेवा घेण्यात आलेली आहे. (For period ०५ August, २०२४ to ०४ August, २०२५). सदर सेवेसाठी ९८,०००/- रुपये देयक (४५ GB Web Space साठी) अदा करण्यात आले आहे. सदरच्या सेवेसाठी मा.कुलगुरु महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. (दि.०३/०८/२०२४) सदर सेवेसाठी करार करण्यात आलेला आहे. सोबत कराराची प्रत जोडण्यात आलेली आहे.<br>सबब, ड्रिम कॉम्प्युटर, कोल्हापूर कंपनीकडून घेण्यात येणाऱ्या sus.ac.in या संकेतस्थळासाठी Annual Maintenance Charges (A.M.C.) बाबत करण्यात आलेल्या कराराची व देयक अदा केल्याबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मा.कुलगुरुमहोदय यांच्याकडून करण्यात आलेली कार्यवाही माहितीस्तव. | परीक्षा व मूल्यमापन मंडळ |
| ठराव: | **ड्रिम कॉम्प्युटर, कोल्हापूर कंपनीकडून घेण्यात येणाऱ्या sus.ac.in या संकेतस्थळासाठी Annual Maintenance Charges (A.M.C.) बाबत करण्यात आलेल्या कराराची व देयक अदा केल्याबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा.कुलगुरुमहोदय यांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०४ ] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (ञ) नुसार, मा. कुलसचिव यांनी सादर करावयाचा विद्यापीठाच्या प्रत्येक सहा महिन्यांचा विकास कार्यक्रमांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**<br>टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (ञ) नुसार, मा. कुलसचिव यांनी विद्यापीठाचा प्रत्येक सहा महिन्यांचा विकास कार्यक्रमांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन दि.०१ जानेवारी, २०२४ ते ३० जून, २०२४ या कालावधीतील मा. कुलसचिव यांनी सादर करावयाचा विद्यापीठाचा विकास कार्यक्रमांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर. | कुलसचिव कार्यालय |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (ञ) नुसार, मा. कुलसचिव यांनी दि.०१ जानेवारी, २०२४ ते ३० जून, २०२४ या कालावधीचा सादर केलेला सहा महिन्यांचा विकास कार्यक्रमांचा अहवाल स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ०५ ]</td><td>

**शास्त्रीय उपकरण केंद्रामधील Field Emission Scanning Electron Microscope (FESEM) with EDS या उपकरणांमधून रसायनांच्या नमुन्यांचे परिक्षण करण्याकरीता निश्चित करण्यात आलेल्या दराची बाब विचारार्थ.**

टिपणी: शास्त्रीय उपकरण केंद्रामधील Field Emission Scanning Electron Microscope (FESEM) with EDS हे उपकरण नव्याने खरेदी करुन Installation करण्यात आले आहे. सदर उपकरणाद्वारे करण्यात येणाऱ्या रासायनिक नमुन्यांचे परिक्षण करण्यासाठी दर निश्चित करण्याकरीता दि.१६/०७/२०२४ रोजी मा.कुलगुरु महोदयांनी तांत्रिक समिती गठीत केली होती. सदर तांत्रिक समितीने दर आकारणी करताना १. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठांतर्गत अधिविभाग व संलग्नित महाविद्यालये २. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाबाहेरील महाविद्यालये व इतर संस्था ३. इंडस्ट्रीज अशा तीन गटांमध्ये विभागणी करुन दि.२७/०७/२०२४ रोजी प्रस्तावित दर निश्चितीचा अहवाल दिला होता. उपरोक्त तांत्रिक समितीने निश्चित केलेल्या दरास दि.०९/०८/२०२४ रोजी मा.कुलगुरु महोदयांनी मान्यता दिलेली आहे. सबब दर खालीलप्रमाणे आहेत.

<table>
<tr><th>PAH Solapur University & Affiliated Institutes (INR)</th><th>Other Institute (INR)</th><th>Industry (INR)</th></tr>
<tr><td>1,500 + 500 = 2,000/-<br>(FESEM) + (EDS)</td><td>2,000 + 500 = 2,500/-<br>(FESEM) + (EDS)</td><td>5,000 + 1,000 = 6,000/-<br>(FESEM) + (EDS)</td></tr>
</table>

तरी वरीलप्रमाणे सन २०२४-२५ या वर्षापासून Field Emission Scanning Electron Microscope (FESEM) with EDS या उपकरणामधुन रसायनांच्या नमुन्यांचे परिक्षण करण्याकरिता आकारण्यात येणारी रक्कम वित्त व लेखा विभागात जमा करण्यासाठी FESEM with EDS या नावाने नवीन अंदाजपत्रकीय शिर्षक तयार करावे लागणार आहे.

सबब, Field Emission Scanning Electron Microscope (FESEM) with EDS या उपकरणामधून रसायनांच्या नमुन्यांचे परिक्षण करण्याकरीता आकारण्यात येणारी रक्कम वित्त व लेखा विभागात जमा करण्यासाठी FESEM with EDS या नावाने नवीन अंदाजपत्रकीय शिर्षक तयार करण्याच्या मान्यतेस्तव.

</td><td>शास्त्रीय उपकरण केंद्र</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>

**शास्त्रीय उपकरण केंद्रामधील Field Emission Scanning Electron Microscope (FESEM) with EDS या उपकरणांमधून रसायनांच्या नमुन्यांचे परिक्षण करण्याकरीता खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या दरास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

<table>
<tr><th>PAH Solapur University & Affiliated Institutes (INR)</th><th>Other Institute (INR)</th><th>Industry (INR)</th></tr>
<tr><td>1,500 + 500 = 2,000/-<br>(FESEM) + (EDS) + GST</td><td>2,000 + 500 = 2,500/-<br>(FESEM) + (EDS) + GST</td><td>5,000 + 1,000 = 6,000/-<br>(FESEM) + (EDS) + GST</td></tr>
</table>

</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०६ ] | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव वर्ष म्हणून विविध उपक्रमाद्वारे साजरा करण्याबाबत उत्सव समिती स्थापन करण्याची बाब आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव साजरा करण्याकरीता रु.१०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख रुपये फक्त) निधीची तरतूद विद्यापीठ फंडातून करण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जयंती महोत्सव वर्ष २०२४-२५ मध्ये साजरा करण्यात येणार असून वर्षभर विविध कार्यक्रमाचे आयोजन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येणार आहे. सदर विविध कार्यक्रमांचे आयोजन व इतर अनुषंगिक बाबींकरीता मा.कुलगुरुमहोदय यांनी खालील समिती गठीत करण्यात आली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव साजरा करण्याकरीता रु.१०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख रुपये फक्त) निधीची तरतूद विद्यापीठ फंडातून करण्याची बाब विचारार्थ. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र |

| अ.क्र. | समिती सदस्यांचे नावे | पद |
|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश महानवर, मा.कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत दामा, प्र-कुलगुरु | सदस्य |
| ३) | प्रा. (डॉ.) विकास घुटे, प्र. वित्त व लेखा अधिकारी | सदस्य |
| ४) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य |
| ५) | डॉ. केदारनाथ काळवणे, संचालक, विद्यार्थी विकास विभाग | सदस्य |
| ६) | डॉ. राजेंद्र वडजे, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना | सदस्य |
| ७) | प्रा. शिवाजी वाघमोडे | सदस्य |
| ८) | डॉ. हनुमंत आवताडे | सदस्य |
| ९) | प्रा. दत्ता डांगे | सदस्य |
| १०) | डॉ. विरभद्र दंडे | सदस्य |
| ११ | डॉ. प्रभाकर कोळेकर | सदस्य-सचिव |

सबब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी महोत्सव उत्सव समिती स्थापन करण्याची बाब आणि तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव साजरा करण्याकरीता रु.१०,००,०००/- (अक्षरी रुपेय दहा लाखे रुपये फक्त) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव साजरा निधीची तरतूद विद्यापीठ फंडातून करण्याची बाब विचारार्थ.

ठराव:

१) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती "महोत्सव वर्ष" म्हणून विविध उपक्रमाद्वारे साजरा करण्याकरीता निधीची तरतूद सदर अध्यासन केंद्रासाठी शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीवरील (Corpus Fund) जमा होणाऱ्या व्याजातून खर्च करण्यास व त्याच अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली खर्ची टाकण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

२) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्रासाठी रु.७५ लाख निधी उपलब्ध करुन पाठपुरावा करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.

१) प्रा. देवानंद काशीनाथ चिलवंत - सदस्य
२) डॉ. वसंत गुरुशांत कोरे - सदस्य
३) श्री. सुधाकर तुकाराम सरवदे - सदस्य
४) श्री. सचिन मारुती गायकवाड - सदस्य
५) डॉ. प्रल्हाद कांबळे - सदस्य

३) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव वर्ष म्हणून विविध उपक्रमाद्वारे साजरा करण्याबाबत खालीलप्रमाणे उत्सव समिती स्थापन करण्यात आली.

| अ.क्र. | उत्सव समिती सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | अध्यक्ष |
| २) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य |
| ३) | प्रा. (डॉ.) विकास भाऊराव घुटे, प्र. वित्त व लेखा अधिकारी | सदस्य |
| ४) | डॉ. केदारनाथ काळवणे, संचालक, विद्यार्थी विकास विभाग | सदस्य |
| ५) | डॉ. राजेंद्र वडजे, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना | सदस्य |
| ६) | प्रा. देवानंद काशीनाथ चिलवंत | सदस्य |
| ७) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य |
| ८) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य |
| ९) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य |
| १०) | डॉ. प्रल्हाद कांबळे | सदस्य |
| ११) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य |
| १२) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य |
| १३) | डॉ. विश्वनाथ आवड | सदस्य |
| १४) | प्रा. शिवाजी वाघमोडे | सदस्य |
| १५) | डॉ. हनुमंत कृष्णा आवताडे | सदस्य |
| १६) | प्रा. दत्ता डांगे | सदस्य |
| १७) | डॉ. विरभद्र चनबस दंडे | सदस्य |
| १८) | डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर | सदस्य-सचिव |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०७ ] | **व्यवस्थापन परिषदेने जिल्ह्यासाठी सांस्कृतिक व विद्यार्थी कल्याण कार्यक्रमाचे जिल्हा समन्वयक म्हणून नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: महाविद्यालय परिसंस्था व विद्यापीठ विभाग यांच्यामधील विविध सांस्कृतिक कार्यक्रमाची आखणी करण्यासाठी व त्यांचे अवेक्षण करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधनियम, २०१६ च्या कलम ५५(१) अन्वये विद्यार्थी विकास मंडळ स्थापन करण्यात आले आहे. तरी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ५५(२) मधील (छ) अन्वये जिल्ह्यांसाठी सांस्कृतिक व विद्यार्थी कल्याण कार्यक्रमाचे जिल्हा समन्वयक म्हणून १) डॉ. यशपाल खेडकर २) डॉ. संतोष पवार ३) डॉ. विश्वनाथ आवड या तीन नावाची शिफारस मा.कुलगुरुमहोदय यांनी केली आहे. तरी तीनपैकी विद्यार्थी कल्याण कार्यक्रमाचे जिल्हा समन्वयक म्हणून एकाचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ. | विद्यार्थी विकास विभाग |
| ठराव: | **सांस्कृतिक व विद्यार्थी कल्याण कार्यक्रमाचे जिल्हा समन्वयक म्हणून डॉ. यशपाल खेडकर यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ०८ ]</td><td>

**शै.वर्ष २०२४-२५ पासून संस्था/महाविद्यालय यांना कौशल्य आधारित अभ्यासक्रमाची मान्यता देणे अथवा मान्यता रद्द करणे व तसेच सामंजस्य करार (MoU) व शुल्काबाबत तयार केलेली अद्यावत नियमावली विद्यापरिषदेने सर्वानुमते ठराव क्र.०६ अन्वये दि.१९ ऑगस्ट, २०२४ रोजी दिलेली मान्यता विचारार्थ.**

टिपणी: विद्यापरिषद ठराव क्र. ८ (१) नुसार कौशल्य विकास सोलापूर केंद्राअंतर्गत सुरु असलेल्या अभ्यासक्रमाची विविध संस्था/महाविद्यालय यांना देण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाची मान्यता देणे अथवा मान्यता रद्द करणे व तसेच सामंजस्य करार (MoU) व शुल्क अद्यावत नियमावली तयार करण्याकरिता खालीलप्रमाणे अध्यक्ष व सदस्य यांची समिती गठित करण्यात आली होती. सदर गठित समितीची बैठक दि.०८/०७/२०२४ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>अध्यक्ष / सदस्य यांचे नाव</th><th>पद</th></tr>
<tr><td>१</td><td>डॉ. प्रशांत मारुती पवार</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>२</td><td>डॉ. शिवाजी विश्वास शिंदे</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>३</td><td>डॉ. डि. एम. झोंबाडे</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>४</td><td>श्री. जे. एम. खैरदी</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>५</td><td>डॉ. प्रभाकर कोळेकर</td><td>सदस्य सचिव</td></tr>
</table>

वरील समिती अध्यक्ष/सदस्य यांनी अभ्यासक्रमाची मान्यता देणे अथवा मान्यता रद्द करणे व तसेच सामंजस्य करार (MoU) व शुल्क अद्यावत नियमावली तयार करुन प्रस्तुत कौशल्य विकास केंद्राकडे सादर केला आहे. सदर अद्यावत नियमावली शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून लागू करणे आवश्यक असल्याने अद्यावत तयार केलेली नियमावली दि.१९ ऑगस्ट, २०२४ रोजी विद्यापरिषदेच्या बैठकीत सादर केली असता खालीलप्रमाणे ठराव पारीत झाला आहे.

<table>
<tr><td>ठराव क्र.६</td><td>शै.वर्ष २०२४-२५ पासून संस्था/महाविद्यालय यांना कौशल्य अधारित अभ्यासक्रमाची मान्यता देणे अथवा मान्यता रद्द करणे व तसेच सामंजस्य करार (MoU) व शुल्काबाबत तयार केलेल्या अद्यावत नियमावलीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td></tr>
</table>

सबब, शै.वर्ष २०२४-२५ पासून संस्था/महाविद्यालय यांना कौशल्य अधारित अभ्यासक्रमाची मान्यता देणे अथवा मान्यता रद्द करणे व तसेच सामंजस्य करार (MoU) व शुल्काबाबत तयार केलेली अद्यावत नियमावली विद्यापरिषदेने सर्वानुमते ठराव क्र.०६ अन्वये दि.१९ ऑगस्ट, २०२४ रोजी दिलेली मान्यता व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

</td><td>कौशल्य विकास केंद्र</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>

**शै. वर्ष २०२४-२५ पासून संस्था/महाविद्यालय यांना कौशल्य आधारित अभ्यासक्रमाची मान्यता देणे अथवा मान्यता रद्द करणे, तसेच सामंजस्य करार (MoU) व शुल्काबाबत तयार केलेल्या अद्यावत नियमावली संदर्भात विद्यापरिषदेच्या दि.१९ ऑगस्ट, २०२४ रोजी बैठकीतील ठराव क्र.०६ सर्वानुमते स्विकारण्यात आला.**

</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०९] | **प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये/संशोधन केंद्र येथे प्रवेशीत संशोधक विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणाऱ्या शुल्कातील विद्यापीठ हिस्सा व संशोधन केंद्राचा हिसा या रक्कमेसंदर्भातील बाब फेरविचारार्थ.**<br>टिपणी:<br>संदर्भ: १. विद्यापरिषदेच्या दि.०९ जुलै, २०२४ रोजीचा ठराव क्र. ७<br>२. अधिष्ठाता मंडळाच्या दि.११ एप्रिल, २०२२ रोजीच्या ३० व्या बैठकीतील ठराव क्र. ११,२१(२), २१(७)<br>३. संदर्भ क्र. २ अन्वये गठीत समितीचा अहवाल.<br>४. विद्यापरिषदेच्या दि.०३ ऑक्टोबर, २०२२ रोजीचा बैठकीतील ठराव क्र. ३१<br>५. व्यवस्थापन परिषदेच्या दि.०७ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. १९(१२)<br>६. प्रस्तुत विद्यापीठाचे जा.क्र. पुअहोसोविसो / शै.सं.व.वि. / संशोधन विभाग/ २०२२/९७५४ दि.२१ डिसेंबर, २०२२ रोजीचे परिपत्रक.<br>संदर्भ क्र. १ अन्वये विद्यापरिषदेच्या दि.०९ जुलै, २०२४ रोजीच्या बैठकीमध्ये विषय क्र. ७ अन्वये संशोधन केंद्र नियमावली व Ph.D. अभ्यासक्रम संचलित संशोधन केंद्र मार्गदर्शक नियमावली करीता गठीत समितीने तयार केलेली नियमावली विचारार्थ सादर केली असता ठराव क्र. ७ पुढील प्रमाणे झाला आहे.<br>**ठराव क्र. ७** — संशोधक विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणाऱ्या शुल्कातील विद्यापीठ हिस्सा व संशोधन केंद्राचा हिसा या रक्कमेसंदर्भातील बाब व्यवस्थापन परिषदेच्या फेरविचारार्थ सादर करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.<br>संशोधक विद्यार्थ्यांकडून महाविद्यालय/संशोधन केंद्र या ठिकाणी जमा केलेल्या शुल्काबाबत विद्यापीठ हिस्सा ठरविण्याबाबतची प्रक्रिया पुढील प्रमाणे झाली आहे. संदर्भ क्र. २ अन्वये अधिष्ठाता मंडळाच्या दि.११ एप्रिल, २०२२ रोजीच्या बैकीतील ठराव क्र.११, २१(२), २१(७) नुसार मा.प्र-कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली चारही अधिष्ठातांची समिती तयार करण्यात आली. ठराव क्र.११ हा पुढील प्रमाणे झाला.<br>**ठराव क्र. ११** — संशोधक विद्यार्थी यांच्याकडून जमा करुन घेतल्या जाणाऱ्या शुल्कामधील प्रवेश शुल्क, प्रयोगशाळा शुल्क व ग्रंथालय ठेव या शुल्काव्यतिरिक्त जमा होणाऱ्या शुल्काच्या ३०% रक्कम विद्यापीठाकडे वर्ग करणे अथवा सुधारित नियमावली तयार करणे या संदर्भात मा. प्र-कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली चारही विद्याशाखेच्या अधिष्ठातांची समिती गठित करण्यात आली. सदरील समितीने घेतलेल्या निर्णयासह सदरचा विषय पुढील बैठकीत फेरसादर करावा असे सर्वानुमते ठरले. | संशोधन विभाग |

उपरोक्त ठराव क्र. ११ नुसार गठित समितीने दि.२७/०७/२०२२ रोजी संदर्भ क्र. ३ अन्वये अहवाल सादर केला.

सदर अहवाल मा.प्र-कुलगुरु यांनी अधिष्ठाता मंडळाच्या वतीने स्विकारुन विद्यापरिषदेच्या विचारार्थ. दि.०३ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या बैठकीमध्ये विषय क्र. ३१ अन्वये ठेवण्यात आला. विद्यापरिषदेने ठराव क्र.३१ अन्वये पुढीलप्रमाणे ठराव पारित केला.

| | |
|---|---|
| ठराव क्र. ३१ | मा. अधिष्ठाता मंडळाच्या ३० व्या बैठकीतील ठराव क्र.११, २१(२) मधील अ.क्र. (क) व २१(७) या ठरावाच्या अनुषंगाने पीएच.डी. विद्यार्थ्यांकडून प्राप्त शुल्काबाबत विद्यापीठ हिस्सा ठरविण्याकरीता गठीत समितीचा मा. अधिष्ठाता मंडळाने स्विकारलेला अहवाल स्विकारुन त्याची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

उपरोक्त ठराव क्र. ३१ अन्वये विद्यापरिषदेने केलेली शिफारस दि.०७ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये विचारार्थ सादर केली असता ठराव क्र.१९(१२) पुढील प्रमाणे करण्यात आला. (संदर्भ क्र.५)

| | |
|---|---|
| ठराव क्र. १३(१२) | पीएच.डी. विद्यार्थ्यांकडून प्राप्त शुल्काबाबत विद्यापीठ हिस्सा ठरविण्याकरीता गठीत समितीचा अहवाल स्विकारुन सदर अहवालानुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार संदर्भ क्र. ६ अन्वये सर्व संलग्नीत महाविद्यालये / संशोधन केंद्र यांना परिपत्राकान्वये कळविण्यात आले आहे.

समितीने सादर केलेल्या अहवालानुसार संशोधक विद्यार्थ्याने महाविद्यालय/संशोधन केंद्र येथे जमा केलेल्या शुल्काबाबत पुढीलप्रमाणे नमुद केले आहे.

| |
|---|
| मा. प्राचार्य/संचालक संशोधन केंद्र यांनी विद्यार्थ्यांनी त्यांच्या महाविद्यालय/संशोधन केंद्राकडे भरलेल्या शिक्षण शुल्काच्या (Tution fee) ३०% रक्कम तसेच यापूर्वी जमा करत असलेले Registration fee (One time), Student Aid Fund, Yuvak Mahostav, Apatkalin Nidhi, Ashwamedha Fee, University Development fee विद्यापीठ हिस्सा म्हणून जमा करावा. |

याबाबत कार्यालयीन निवेदन असे की,

विद्यापीठाकडून आकारण्यात येत असलेले Student Aid Fund, Yuvak Mahostav, Apatkalin Nidhi, Ashwamedha Fee, University Development fee हे शुल्क विद्यार्थी विकास, स्पोर्ट, संलग्नता विभागाच्या अंतर्गत येत असल्याने संशोधन विभागाकडे कोणतेही शुल्क जमा होत नाही व सदरची रक्कम इतर ठिकाणी वापरात येत नाही. यापूर्वी केवळ हिच रक्कम विद्यापीठ हिस्सा म्हणून घेण्यात येत असे.

| | | |
|---|---|---|
| | प्रस्तुत विद्यापीठाच्या संशोधन विभागामार्फत पीएच.डी. प्रवेश पूर्व परीक्षेपासून व विद्यार्थ्याने पीएच.डी. करीता प्रवेश घेतल्यापासून अंतीम मौखिक परीक्षेपर्यंतची सर्व कामे केली जातात. याकरीता पीएच.डी. नियमावली करीता समिती गठीत करणे, प्रवेशाकरीता मौखिक परीक्षेसाठी CAC (पूर्वीची CRC/DRC) समिती गठीत करणे, संशोधन व मान्यता समिती (RRC) गठीत करणे व सदर समित्यांच्या वेळोवेळी बैठका आयोजित करणे. विद्यार्थ्यांचे कच्चे शोध निबंध तपासणी करीता समितीस पाठविणे, त्यांच्या बैठका घेणे, बहिस्थ परिक्षक, मार्गदर्शक यांना अंतिम शोध प्रबंध तपासणीकरीता पाठविणे, मौखिक परीक्षेचे आयोजन करणे. कार्सेवर्क कार्यशाळा आयोजित करणे. याकरीता आता सद्यस्थितीत संशोधन केंद्राकडून विद्यापीठ हिस्सा प्राप्त रक्कमेतुनच CRC/DRC, RRC व इतर समित्यांच्या बैठकीचे आयोजन, प्रवास भत्ता, दैनंदिन भत्ता इत्यादी साठी जमा रक्कमेपेक्षा अधिकचा खर्च होतो. कच्चे शोध प्रबंध व अंतिम शोध प्रबंध तपासणी करीता पाठविण्याकरीता पोस्टल चार्जेस व इतर खर्च हा सुध्दा जास्त आहे.<br>तसेच विद्यापीठाकडून मौखिक परीक्षेकरीता विद्यार्थ्यांकडून केवळ रु.१२,०००/- शुल्क आकारले जाते, तथापी एका विद्यार्थ्यांच्या मौखिक परीक्षेकरीता अंदाजे १८,००० ते २२,०००/- इतका खर्च येतो.<br>उपरोक्त वस्तुस्थिती पाहता, विद्यापीठ हिस्स्याबाबत शिक्षण शुल्काच्या (Tution fee) ३०% ऐवजी ४०% रक्कम तसेच यापूर्वी जमा करत असलेले Registration fee (One time), Student Aid Fund, Yuvak Mahostav, Apatkalin Nidhi, Ashwamedha Fee, University Development fee विद्यापीठ हिस्सा म्हणून घेण्यात यावा अशी विभागाची धारणा आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये/संशोधन केंद्र येथे प्रवेशीत संशोधक विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणाऱ्या शुल्कातील विद्यापीठ हिस्सा व संशोधन केंद्राचा हिसा या रक्कमेसंदर्भातील बाब फेरविचारार्थ. | |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये/संशोधन केंद्र येथे प्रवेशित संशोधक विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणाऱ्या शुल्कातील विद्यापीठ हिस्सा व संशोधन केंद्राचा हिस्सा हा शैक्षणिक वर्ष २०२३-२४ प्रमाणे घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १० ] | **प्रत्येक महाविद्यालयात ज्याप्रमाणे वेगवेगळ्या विषयांचे विभागप्रमुख पदे असते, त्याप्रमाणे ग्रंथपाल पदास ग्रंथपाल विभागप्रमुख म्हणून मान्यता देण्याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या दि.२२/०३/२०२४ रोजीच्या बैठकीतील श्री. सचिन मारुती गायकवाड यांनी सादर केलेल्या आयत्या वेळेच्या विषयावरील ठरावाच्या अनुषंगाने सदरचा विषय सविस्तर माहितीसह.**<br>टिपणी: उपरोक्त विषयामध्ये श्री. सचिन मारुती गायकवाड यांनी महाविद्यालयात ज्याप्रमाणे वेगवेगळया विषयाचे विभागप्रमुख पद असते, उदा. मराठी विभागप्रमुख, इंग्रजी विभागप्रमुख, इतिहास विषयाचे विभागप्रमुख त्याचप्रमाणे ग्रंथपाल पदास ग्रंथालय विभागप्रमुख मान्यता देण्यात यावी असा ठराव व्यवस्थापन परिषदेस सादर केलेला आहे. त्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या दि.०३/०२/२०२३ रोजीच्या अधिसभा बैठकीत ठरावाचा संदर्भ दिलेला आहे. यानुसार महाविद्यालयातील ग्रंथपाल पदास विभागप्रमुख म्हणून आदेश निर्गमीत करण्याबाबत विद्यापीठ परिनियम S.२५० नुसार योग्य ती कार्यवाही नियमानुसार करण्यात यावी असे कळविले आहे.<br>स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी संलग्नीत महाविद्यालय यांना काढलेले दि.०१ मार्च, २०२४ रोजीचे परिपत्रकामध्ये संबंधीत विद्यापीठाच्या परिनियम २५० मधीलतरतूद व विद्यापीठाच्या अधिसभेमध्ये झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने महाविद्यालयात ग्रंथपाल पदास विभागप्रमुख म्हणून ग्राह्य धरण्यात यावे याबाबत कळविले आहे.<br>याबाबत कार्यालयीन निवेदन असे की, प्रस्तुत विद्यापीठातील अभ्यासमंडळे व सभा व निवडणुका विभाग यांच्याकडून संयुक्तीकरित्या स्थायी व अस्थायी अभ्यासमंडळे स्थापन करण्याची कार्यवाही करण्यात येते. प्रस्तुत विद्यापीठातील परिनियम क्र.५०४ मधील तरतुदीनुसार ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रमाचे अस्थायी मंडळ गठित करण्यात आलेले असून विद्यापरिषदेच्या दि.१० जानेवारी, २०२३ रोजीच्या ठराव क्र.४५ नुसार अस्थायी अभ्यासमंडळावरील सदस्य नेमण्याचे अधिकार मा. कुलगुरु महोदय यांना देण्यात आलेले आहेत.<br>प्रस्तुत विद्यापीठामध्ये दैनंदिन कार्यालयीन दैनंदिन कामकाजामध्ये शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी निर्गमीत केलेले परिनियमांचा आधार घेण्यात येतो. विभागप्रमुखाच्या बाबतीत शिवाजी विद्यापीठ परिनियम S.२४६ मधील तरतूद खालीलप्रमाणे. | शिक्षक मान्यता विभाग-२ |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| | परिनियम S.२४६<br><br>S.246. Headship of the Department in the College or Recognised Institution shall be by rotation.<br><br>The Principal shall nominate one of the teachers, by rotation, as the Head of the Department for a period of five years subject to the provisions, made in the Section 42 of the act, in the following manner:<br>1) If there is only one teacher either in senior or selection grade or designated Reader, he/she shall be appointed as Head of the Department.<br>2) In case, if there are more than one teacher either in Selection grade or as designated Reader, then Principal shall appoint one of them as Head of the Department on the basis of seniority.<br>3) If there is no teacher in selection grade or as designated Reader but there are morethan one teacher in senior scale, then Principal shall appoint one of them as Head of the Department on the basis of Seniority.<br>4) If these are more than one teacher, then the Principal shall appoint one of them as Head of the Department on the basis of Seniority.<br>5) Headship of the teacher, before the completion of the tenure, shall not be withdrawn without a prior permission of the University.<br>6) The teacher appointed as Head of the Department shall be eligible for remission in workload as per the Statute.<br><br>परिनियम S.२४६ मधील तरतूदी विचारात घेता महाविद्यालयामध्ये विभागप्रमुख नेमण्याविषयीची संपूर्ण प्रक्रिया ही महाविद्यालयातील प्राचार्यांमार्फत प्रत्येक पाच वर्षांनी रोटेशन पद्धतीने करावयाची आहे. तथापि, नियुक्त केलेल्या विभागप्रमुखाचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय संबंधीत विभागप्रमुखाचा पदभार काढता येणार नाही. परिनियम S.२४६ मधील तरतूदीनुसार विद्यापीठामार्फत महाविद्यालयातील विभागप्रमुख नेमण्याबाबतची कोणतीही कार्यवाही करण्यात येत नाही.<br><br>सबब, प्रस्तुत विद्यापीठाच्या परिनियम २४६ मधील तरतूद विचारात घेता विभागप्रमुख नेमण्याची संपूर्ण प्रक्रिया ही महाविद्यालय स्तरावरील असल्याने सदरची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | **सदरचा विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आला.** | |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th colspan="2">विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ११ ]</td><td colspan="2">दि.०६/०८/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.<br>टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि.०६/०८/२०२४ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.<br>विद्यापीठ परिनियम S.३३९(f) नुसार दि.०६/०८/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.<br>सबब, दि.०६/०८/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.</td><td rowspan="4">अभियांत्रिकी विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td colspan="2">दि.०६/०८/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतातील विषय क्र. ४ व ५ वर झालेल्या ठरावामध्ये खालील दुरुस्तीसह इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td></tr>
<tr><td rowspan="2"></td><td>ठराव क्र.४</td><td>मुख्य प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन येथे क्रॉकीट रोड, गटर आणि फूटपाथ इ. काम करणे या कामासाठी प्रसिध्द केलेल्या ई-निविदेनुसार मे. भारत तुकाराम चौगुले, सोलापूर यांचे अंदाजपत्रकीय रक्कम रु.०२,५९,०८,७९६ (अक्षरी रुपये दोन कोटी एकोणसाठ लाख आठ हजार सातशे श्याणव फक्त) पेक्षा २२.७८ टक्के कमी दराने म्हणजेच रु.०२,००,०६,७७२/- (अक्षरी रुपये दोन कोटी सहा लाख सातशे बाहत्तर फक्त) मध्ये काम मंजूर करण्याची व कार्यारंभ आदेश देण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली.</td></tr>
<tr><td>ठराव क्र.५</td><td>मुख्य प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन येथे गार्डन, लॉन्स व झाडे लावणे या कामासाठी प्रसिध्द केलेल्या ई-निविदेनुसार मे. पेनूरकर प्लॉट टेक्नॉलॉजी, सोलापूर यांचे अंदाजपत्रकीय रक्कम रु.९२,६९,८८६/- (अक्षरी रुपये ब्याणव लाख एकोणसत्तर हजार आठशे श्याऐंशी फक्त) पेक्षा २७.७३ टक्के कमी दराने म्हणजेच रु.६६,९९,३४७/- (अक्षरी रुपये सहासष्ट लाख नव्याणव हजार तीनशे सत्तेचाळीस फक्त) मध्ये काम मंजूर करण्याची व कार्यारंभ आदेश देण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली.</td></tr>
</table>

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १२ ] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९४(६) (क) व ३१(यघ) नुसार, सन २०२३-२४ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व पुर्तता अहवाल संदर्भात दि.२७/०८/२०२४ रोजीच्या वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्याकरिता M/s.SKVM & COMPANY, सोलापूर यांची संवैधानिक लेखापरीक्षक म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात आली होती. M/s.SKVM & COMPANY, सोलापूर यांनी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करुन लेखापरीक्षण अहवाल दिलेला आहे.<br>लेखापरिक्षीत लेखे, लेखापरिक्षण अहवाल दि.२७/०८/२०२४ रोजी वित्त व लेखा समितीच्या बैठकीत विषय क्र.०२ अन्वये सादर केला असता, त्यावर विचारविनिमय होवून खालीलप्रमाणे मान्यतेची शिफारस करण्यात आली.<br>ठराव: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९४(६) (क) नुसार सन २०२३-२४ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व त्याचा पूर्तता अहवाल स्विकारुन व मान्यता देवून व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.<br>सबब, वित्त व लेखा समितीने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व त्याचा पूर्तता अहवाल स्विकारुन वरीलप्रमाणे केलेली मान्यतेची शिफारस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९४(६) (क) व ३१(यघ) नुसार स्विकारुन मान्यता देण्याची बाब विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९४(६) (क) व ३१(यघ) नुसार, सन २०२३-२४ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व पुर्तता अहवालाबाबत संदर्भात दि.२७/०८/२०२४ रोजीच्या वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.**<br>**तसेच संकुलाच्या जमा खर्चाचा ताळमेळ घेवून शिफारशी करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.** | |

| अ.क्र. | समिती सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | अध्यक्ष |
| २) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य |
| ३) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य |
| ४) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य |
| ५) | प्रा. (डॉ.) गौतम सुबाना कांबळे | सदस्य |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ १३ ] | दि.१३ जून, २०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने SHPC या गोपनीय फर्मच्या देयकासंदर्भात सत्यता पडताळणी करण्यासाठी खालीलप्रमाणे गठीत केलेल्या त्रिसदस्यीय समितीचा फेर अहवाल विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
| --- | --- | --- |
| १. | डॉ. समाधान दिगंबर पवार (मा.व्यवस्थापन परिषद सदस्य) | अध्यक्ष |
| २. | श्री. सचिन मारुती गायकवाड (मा.व्यवस्थापन परिषद सदस्य) | सदस्य |
| ३. | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>(संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ) | सचिव |

व्यवस्थापन परिषदेच्या दि.१९ जुलै, २०२४ रोजीच्या बैठकीतील विषय क्रमांक [१९] चा ठराव: दि.१३ जुन, २०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत SHPC या गोपनीय फर्मच्या देयकासंदर्भात सत्यता पडताळणी करण्यासाठी गठीत केलेल्या त्रिसदस्यीय समितीचा अहवाल खालील अटींच्या अधिन राहून सर्वानुमते स्विकारण्यात आला.

१. SHPC या गोपनीय फर्मच्या मार्च/एप्रिल, २०२४ च्या परीक्षांच्या देयकामधून रु.२,१३,२००/- इतकी रक्कम वजा करुन उर्वरित रक्कम अदा करण्यात यावी.
२. सदर प्रकरणांबाबत जबाबदारी निश्चित करण्यासाठी समितीने पुनश्चः बैठक घेऊन अहवाल सादर करावा असे सर्वानमुते ठरले.

असा ठराव झाला आहे.

उपरोक्त ठरावातील अनुक्रमांक २ नुसार गठीत समितीने सदर प्रकरणांबाबत जबाबदारी निश्चित करण्यासाठी दि.२६/०८/२०४ व दि.२८/०८/२०२४ रोजी बैठका घेवून खालीलप्रमाणे मा.कुलसचिव महोदय यांचे नावे अहवाल सादर केला आहे.

परीक्षेच्या गोपनीय कामाचे देयकासंदर्भात जबाबदारी निश्चित करणेबाबतची समिती
अहवाल

वार: बुधवारी, दि.२८/०८/२०२४

दि.१९ जुलै, २०२४ रोजीच्या मा.व्यवस्थापन परिषदेने केलेल्या ठरावानुसार SHPC या गोपनीय फर्मच्या देयकासंदर्भात जबाबदारी निश्चित करुन अहवाल सादर करण्यासाठी डॉ.समाधान पवार यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती गठीत केली आहे. सदर बैठकीसाठी मा. वित्त व लेखा अधिकारी यांना निमंत्रित सदस्य म्हणून आमंत्रित केले होते.

SHPC या गोपनीय फर्मच्या मार्च, २०२० परीक्षेच्या देयकासंदर्भात जबाबदारी निश्चिती करणे कामी गठीत समितीची दुसरी बैठक दि.२८/०८/२०२४ रोजी मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्या दालनात पार पडली. सदरच्या बैठकीत सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

व्यवस्थापन परिषदेच्या १९ जुलै, २०२४ रोजीच्या विषय क्रमांक १९ च्या ठरावातील मुद्दा क्रमांक २ नुसार SHPC Technology pvt. Ltd. या फर्मच्या मार्च, २०२० च्या परीक्षेच्या देयकासंदर्भात जबाबदारी निश्चित करणे कामी नेमलेल्या समितीच्या दोन बैठका दि.२६/०८/२०२४ व दि.२८/०८/२०२४ रोजी परीक्षा व मुल्यमापन विभागामध्ये संपन्न झाल्या. समितीने विद्यापीठ परीक्षा मार्च २०२० च्या देयका संदर्भातील सर्व कागदपत्रे पडताळून पाहिली. दि २८/०८/२०२४ च्या बैठकी साठी F/O प्रा.डॉ.विकास घुटे यांना निमंत्रित सदस्य म्हणून बोलविण्यात आले होते.

| | | |
|---|---|---|
| | <u>समितीने खालील निरिक्षणे नोंदविली:</u><br>१. SHPC Technology Pvt. Ltd फर्मने मार्च २०२० परीक्षेच्या संदर्भातील बील हे त्यांना देण्यात आलेल्या दि.२८/०२/२०२० च्या वर्क ऑर्डर प्रमाणे न देता ते दिनांक ०२/०१/२०२३ च्या Work Order प्रमाणे बील सादर केलेचे दिसून येते.<br>२. SHPC फर्मने मार्च २०२० च्या परीक्षेचे बील दि.०२/०१/२०२३ च्या वर्क ऑर्डर प्रमाणे का दिले या संदर्भात कोणतेही कागदपत्रे परीक्षा विभागाकडे उपलब्ध असलेचे दिसून येत नाही.<br>३. SHPC फर्मने मार्च २०२० परीक्षेचे सादर केलेल्या बिलास तत्कालिन संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांनी दि.१४/०२/२०२३ रोजी मान्यता देवून व तत्कालीन मा. कुलगुरु यांच्या मान्यतेस पाठविलेचे दिसुन येते.<br>४. तत्कालिन मा.कुलगुरु, पु.अ.हो.सो.वि.सोविसो यांनी SHPC या फर्मचे मार्च २०२० च्या परीक्षेच्या बीलास दि.१५/०२/२०२३ रोजी मान्यता दिलेचे दिसुन येते.<br>५. वित्त व लेखा विभागाने तत्कालिन मा. कुलगुरुच्या दि.१५/०२/२०२३ च्या टिपणीच्या आधारे दि.२८/०२/२०२३ रोजी रुपये ७,७२,४०७/- Online पध्दतीने अदा केलेचे दिसुन येते.<br>६. सदर बील अदा करताना मार्च २०२० च्या परीक्षेची Work Order (२८/०२/२०२०) दुर्लक्षित करुन दि.०२/०१/२०२३ च्या वर्क ऑर्डर मधील दरानुसार रक्कम अदा केलेचे दिसून येते. त्यामुळे विद्यापीठाचे रुपये २,१३,२००/- अधिकची रक्कम SHPC Technology या फर्मला अदा केलेचे दिसुन येते.<br>७. SHPC Technology Pvt.Ltd या फर्मने मार्च २०२० च्या परीक्षेचे बील त्याच वर्षात (२०२०) सादर न करता दि.०२/०१/२०२३ रोजी सादर केलेचे दिसुन येते. बील सादर करण्यात फर्मचा निष्काळजीपणा दिसुन येतो.<br>८. वास्तविक पाहता विद्यापीठाचे आर्थिक हीत पाहण्याची सामुदायिक जबाबदारी असताना तत्कालीन संचालक, परीक्षा व मुल्यमापन, मा.कुलगुरु व वित्त व लेखा अधिकारी यांनी सादर बिलामध्ये कोणती ही त्रुटी न काढता किंबहुना त्याकडे दुर्लक्ष करुन बिले अदा केलेचे दिसुन येते.<br><u>शिफारस:</u><br>१. SHPC Technology Pvt.Ltd, तत्कालिन संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, व तत्कालीन मा. वित्त व लेखा अधिकारी यांच्या संगनमताने विद्यापीठाचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसुन येत असलेने याची सर्व जबाबदारी या सर्व संबधितावर निश्चित करण्यात येत आहे.<br>२. SHPC Technology Pvt.Ltd या फर्मला अदा केलेली अधिकचे रक्कम रुपये २,१३,२००/- ही मार्च २०२४ च्या परीक्षा देयकामधून वसुल करण्यात यावी.<br>सबब, १९ जुलै, २०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने सदर प्रकरणांबाबत जबाबदारी निश्चित करण्यासाठी समितीने पुनश्च: बैठका घेवून सादर केलेला अहवाल विचारार्थ. | |
| ठराव: | **दि.१३ जून, २०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने SHPC या गोपनीय फर्मच्या देयकासंदर्भात सत्यता पडताळणी करण्यासाठी गठीत केलेल्या त्रिसदस्यीय समितीचा फेर अहवालानुसार SHPC Technology Pvt.Ltd या फर्मला अदा केलेली अधिकची रक्कम रुपये २,१३,२००/- ही मार्च, २०२४ च्या परीक्षा देयकामधून वसुली संदर्भात कायदेशीर नोटीस देण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १४ ] | Centralized Data Centre, Printing Press, Answer book Store System संदर्भातील समितीचा अहवाल विचारार्थ.<br>टिपणी: दि.०६/०८/२०२४ रोजी मा. प्र. कुलगुरु महोदय, प्रा. डॉ. लक्ष्मीकांत ब. दामा यांच्या अध्यक्षतेखाली सर्व समिती सदस्य यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे अभ्यास पाहणी दौरा केला. या समितीमध्ये मा. व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत सर, श्री. सचिन गायकवाड सर, मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. वसंत कोरे सर तसेच संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ डॉ. श्रीकांत ग. अंधारे यांचा समावेश होता. या पाहणी दौ-यामध्ये Centralized Data Centre, Printing Press, Answer book Store System याची सुक्ष्मपणे माहिती घेतली. याअनुषंगाने माहितीची कागदपत्रे देखील अहवालासोबत जोडली आहेत.<br>प्रस्तुत विद्यापीठामध्ये Centralized Data Centre असणे अत्यंत आवश्यक आहे. ज्यामुळे सर्व विद्यापीठाचा एकत्रितरीत्या डेटा एकाच ठिकाणी संग्रहित राहतो. त्याचबरोबर विद्यापीठास Digitization कडे नेण्याकरिता सदर Centralized Data Centre अत्यंत महत्वपूर्ण आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथील Centralized Data Centre ४५ TB क्षमतेचे आहे. साधारणत: याकरीता २.५ कोटी खर्च उभारणीसाठी आलेला असून, आजपर्यंत यामाध्यमातून २०० कोटीची उलाढाल झाल्याचे संबंधित अधिका-यांनी सांगितले.<br>तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे स्वतंत्रपणे विद्यापीठाची Printing Press आहे. ज्यामुळे परिक्षाविषयक व अंन्य सर्व छपाई अगदी अल्प दरात केली जाते. सदर प्रिंटींग प्रेसकरिता साधारणत: ४५ लाख खर्च आल्याचे सांगण्यात आले. अशा पध्दतीची प्रिंटींग प्रेस प्रस्तुत विद्यापीठात असणे आवश्यक आहे. ज्यामुळे अनेक गोपनीय बाबींची छपाई व पैशांची बचत सुलभपणे होऊ शकेल.<br>Anser book Store System याकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास ११ कोटी खर्च आल्याचे सांगण्यात आले. सदर स्टोअर सिस्टीम ही अत्यंत महत्वाची असून गोपनीय कागदपत्रे जतन या माध्यमातून केल्यास प्रस्तुत विद्यापीठास त्याचा चांगला फायदा होईल. त्याचबरोबरच स्टुडियोलाही भेट देण्यात आली. वरील सर्व बाबी या महत्वपूर्ण असून त्याअनुषंगाने सदर समितीने अहवाल सादर केलेला आहे.<br>सबब, Centralized Data Centre, Printing Press, Answer book Store System संदर्भातील समितीचा अहवाल विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | Centralized Data Centre, Printing Press, Answer book Store System संदर्भातील समितीचा अहवाल स्विकारुन सर्वानुमते खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | तपशील | अंदाजपत्रकीय तरतुद |
|---|---|---|
| १) | Centralized Data Centre | रु. ०४ कोटी |
| २) | Printing Press | रु. ०१ कोटी |
| ३) | Answer book Store System (१० नग) | रु.२.५ कोटी<br>(रु.०१ कोटी PM USHA मधून व १.५ कोटी विद्यापीठ फंडातून घेण्यात यावेत.) |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १५ ] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या तत्कालीन उपकुलसचिव श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांना विभागीय चौकशीअंती सेवेतून दि. २१/१२/२०१९ रोजीच्या कार्यालयीन आदेशाद्वारे उपकुलसचिव पदावरुन बडतर्फ केल्यानंतर त्यांनी विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांच्याकडे अपील क्र. ०२/२०२० दाखल केलेली होती. सदर अपीलात दि. ०५/०९/२०२४ रोजी पारित करण्यात आलेल्या आदेशाच्या अनुषंगाने प्रस्तावित कार्यवाहीबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या तत्कालीन उपकुलसचिव श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांना विभागीय चौकशीअंती सेवेतून दि.२१/१२/२०१९ रोजीच्या कार्यालयीन आदेशाद्वारे उपकुलसचिव पदावरुन बडतर्फ करण्यात आलेले आहे. सदर आदेशाविरुध्द श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांनी प्रस्तुत विद्यापीठाविरुध्द मे. विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांच्याकडे अपील क्र. ०२/२०२० दाखल केलेली होती. सदर अपीलामध्ये शासनास Respondent करण्यात आलेले नाही.<br>अपीलामध्ये दि.०५/०९/२०२४ रोजी निकाल देताना मे. न्यायाधिकरणाने श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांनी दाखल केलेले अपील क्र. ०२/२०२० मान्य करताना प्रस्तुत विद्यापीठाने श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे दि.२१/१२/२०१९ रोजी दिलेले सेवासमाप्तीचे आदेश रद्द करुन त्यांना निकाल दिनांकापासून म्हणजे दि.०५/०९/२०२४ पासून २ महिन्यांमध्ये उपकुलसचिव या पदावर रुजू करुन घेण्याबाबत आदेश पारित केलेले आहेत. तसेच त्यांना सेवा सातत्यता, मागील वेतन व इतर भत्ते शासन नियमानुसार बडतर्फीच्या दिनांकापासून सेवे रुजू होईपर्यंत देण्याबाबत आदेश पारित करुन Respondent विद्यापीठाने त्यांना Cost पोटी रु. १०,०००/- व इतर बाबी नमूद करुन या व इतर बाबी नमूद करुन आदेश पारित करुन अपील निकाली काढलेले आहे.<br>सदर आदेशाच्या अनुषंगाने श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांनी विद्यापीठास दि.०६/०९/२०२४ रोजी अर्ज सादर करुन वर नमूदप्रमाणे त्यांनी मे. विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांच्याकडे दाखल केलेल्या अपील क्र.०२/२०२० मध्ये दि.०५/०९/२०२४ रोजी पारित करण्यात आलेल्या आदेशानुसार उपकुलसचिव पदावर रुजू करुन घेण्याबाबत विनंती केलेली आहे.<br>सदर अपीलात दि.०५/०९/२०२४ रोजी पारित करण्यात आलेल्या आदेशाच्या अनुषंगाने प्रस्तावित कार्यवाहीबाबतची बाब विचारार्थ. | कायदा विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाच्या तत्कालीन उपकुलसचिव श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांच्याबाबत प्राप्त न्यायाधिकरणाच्या आदेशांनुसार पुढील कार्यवाही ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.** | |

| अ.क्र. | समिती सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | अध्यक्ष |
| २) | योगिनी घारे | सदस्या |
| ३) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य |
| ४) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या |
| ५) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य |
| ६) | ॲड. प्रविण बी. शेंडे | सदस्य |
| ७) | ॲड. एस. व्ही. उजळंबे | सदस्य |
| ८) | ॲड. जावेद अहमद म.हनीफ खैरदी | सदस्य-सचिव |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १६ ] | **विद्यापीठाच्या कार्यालयीन कामासाठी १ नवीन जेसीबी वाहन खरेदी करण्याची बाब विचारार्थ.** | अभियांत्रिकी विभाग |

टिपणी: विद्यापीठाचा केगाव परिसरात विविध इमारतींचे बांधकाम, अंतर्गत रस्ते व विविध विकास कामे करण्यात आली आहेत. मौजे कोंडी येथील ४८२ एक परिसरात विविध इमारतीचे बांधकाम, खेलो इंडिया योजने अंतर्गत मल्टीपर्पज हॉल बांधणे, अंतर्गत रस्ते तयार करणे. पी एम उषा योजने अंतर्गत विविध इमारती बांधकाम करणे व विविध विकास कामे करावयाची आहेत. सदर परिसरामध्ये येण्या - जाण्यासाठी रस्ता नसून तेथील उपलब्ध मूरुम, दगड व माती इ. साहयाने रस्ता तयार करुन घ्यावा लागणार आहे. तसेच सदर संपूर्ण परिसरात विविध वृक्षांची लागवड करण्यासाठी खड्डे खोदणे व चरी मारावी लागणार आहे.

सद्यस्थितीत राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून विविध प्रकारच्या १ लक्ष वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालयातील विद्यार्थी व विविध घटकांकडून वृक्षांची लागवड करण्यासाठी खड्डे खोदणे व चरी मारणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी वेळोवेळी जेसीबी वाहनाची गरज भासत आहे. ज्या - ज्या वेळी खड्डे मारण्याची आवश्यकता असते त्या - त्या वेळी स्थानिक बाजारपेठेतून जेसीबी भाडेतत्वावर घ्यावे लागत असून त्यासाठी मोठया प्रमाणात खर्च होत आहे विद्यापीठाकडून जेसीबी वाहनाची खरेदी केल्यास विविध कामे करण्यास उपयुक्त ठरणार असून त्यामुळे आर्थीक बचत होईल.

याबाबत सोलापूर शहरातील जेसीबी सेवा खरेदी - विक्री करणाऱ्या पुरवठाधारक मे.सिध्दार्थ ॲटो इंजिनिअर्स, प्रा. लि. सोलापूर यांचेकडून विविध मॉडेलचे जेसीबी वाहनाच्या खरेदीचे दरपत्रक प्राप्त करुन घेण्यात आले असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **Models** | **3DX** | **3DX-Plus** | **3DX- Xtra** | **3DXX4WD** | **3DX SUPER** | **JCB 30 MINI EXCAVATOR** |
|---|---|---|---|---|---|---|
| | 3DX New 49.5 HP/ 3DX/STD/1. 1/0.26/2W D/HD/LL | 3DXPlus_ CEV-IV/1.1 /0.26/2WD /HD/LL/74 HP | 3DX Xtra _ CEV- IV/1.1 /0.30/2WD /HD/LL/AM T/74HP | 3DX 4WD_ CEV- IV/1.1 /0.26//HDT /LL/74HP | 3DX Super_ CEV- IV/6 IN 1/0.30/ 4WD/HD/L L/AMT/ 74HP | JCB 30 Plus with Hammer circuit and 540 MM Width Bucket |
| Price | 29,75,000/- | 31,68,000/- | 32,36,000/- | 32,72,500/- | 33,75,000/- | 23,25,000/- |
| GST 18% (CGST 9 % + CGST 9 %) | 5,35,500/- | 5,70,240/- | 5,82,840/- | 5,89,050/- | 6,07,500/- | 4,18,500/- |
| Sub Total | 35,10,500/- | 37,38,240/- | 38,18,480/- | 38,61,550/- | 39,82,500/- | 27,43,500/- |
| Approx. TCS @ 1% On above Total Price | 35,105/- | 37,382/- | 38,185/- | 38,616/- | 39,825/- | 27,435/- |
| **Total** | **35,45,605/-** | **37,75,622/-** | **38,56,665/-** | **39,00,166/-** | **40,22,325/-** | **27,70,935/-** |

सबब, विद्यापीठाच्या कार्यालयीन कामासाठी १ नवीन जेसीबी वाहन खरेदी करण्याची बाब विचारार्थ.

ठराव: **विद्यापीठाच्या कार्यालयीन कामासाठी १ नवीन जेसीबी वाहन खरेदी करण्याऐवजी विद्यापीठाकडे सद्यस्थितीत असलेल्या ट्रॅक्टरला ड्रिलिंग व बकेट बसवण्यासाठी ५ लाखाची तरतूद करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १७ ] | **विद्यापीठाच्या सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्र (संक्रमण सुविधा केंद्रातील) कक्षांचे दर सुधारित करणेबाबत.**<br>टिपणी: व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक १३/१२/२०१९ च्या बैठकीतील विषय क्रमांक १ वर झालेल्या ठरावानुसार विद्यापीठ परिसरातील व्ही आय पी अतिथीगृह व विद्यापीठाच्या सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्र (संक्रमण सुविधा केंद्रातील ) कक्षांचे दर खालीलप्रमाणे आहेत. | अभियांत्रिकी विभाग |

| अ क्र | निवासाचा प्रकार | प्रस्तुत विद्यापीठाच्या कार्यालयीन कामासाठी येणारे अतिथी (विविध प्राधिकरणाचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी ) | विद्यापीठाच्या संलग्नीत महाविद्यालयीन कार्यालयीन / संघटनेच्या कामासाठी | प्रस्तुत विद्यापीठाच्या महाविद्यालयाच्या खाजगी कामासाठी | इतर विद्यापीठांच्या कार्यालयीन कामासाठी | इतर विद्यापीठातील संलग्नीत महाविद्यालयांच्या कार्यालयीन कामासाठी | इतर विद्यापीठातील संलग्नीत महाविद्यालयांच्या खाजगी कामासाठी | संशोधक/ इतर विद्यार्थ्यांक रिता | इतर शासकीय कार्यालयां च्या कार्यालयीन कामासाठी | इतर शासकीय कार्यालयां च्या खाजगी कामासाठी | बाहेरील व्यक्ती/ खाजगी संस्था |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | व्ही.आय. पीरुम | रु. ५०/- | रु.३००/- | रु.३००/- | रु.३००/- | रु.३००/- | रु.३००/- | ---- | रु.३००/- | रु.३००/- | रु.५००/- |
| २ | एसी रुम | रु. ५०/- | रु.२००/- | रु.२००/- | रु.२००/- | रु.२००/- | रु.२००/- | रु.१००/- | रु.२००/- | रु.२००/- | रु.३००/- |

टीप:

१. विद्यापीठाच्या संकुलाच्या/ विभागामार्फत कार्यारंभ आदेश दिलेल्या खाजगी संस्था/ कंपन्या व व्यक्ती यांना बाहेरील व्यक्ती/ खाजगी संस्था याप्रमाणे दर लागू राहतील.

२. वरील दर हे प्रती व्यक्ती/ प्रती बेड याप्रमाणे राहतील. (सोबत मा.व्यवस्थापन परिषदेच्या दि.१३/१२/२०१९ च्या बैठकीचा ठराव व शुल्काचा तक्ता अवलोकनार्थ जोडला आहे.)

उपरोक्तप्रमाणे विद्यापीठाच्या सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्र (संक्रमण सुविधा केंद्रातील) कक्षांचे दर सुधारित करावयाचे आहेत.

सबब, विद्यापीठाच्या सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्र (संक्रमण सुविधा केंद्रातील) कक्षांचे दर वरील तक्त्यास अनुसरुन सुधारित करणेची बाब विचारार्थ.

**ठराव:** १. विद्यापीठाच्या सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्र (संक्रमण सुविधा केंद्रातील) तसेच विद्यापीठातील गेस्ट हाऊसचे दर सर्वानुमते खालीलप्रमाणे सुधारित करण्यात आले.

२. गेस्ट हाऊसच्या संदर्भात नियमावली तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.

१. डॉ. समाधान दिगंबर पवार - अध्यक्ष २. श्री. सचिन मारुती गायकवाड - सदस्य ३. योगिनी घारे - सदस्य सचिव

| अ क्र | निवासाचा प्रकार | प्रस्तुत विद्यापीठाच्या कार्यालयीन कामासाठी येणारे अतिथी (विविध प्राधिकरणाचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी) | विद्यापीठाच्या संलग्नीत महाविद्यालयीन कार्यालयीन / संघटनेच्या कामासाठी | प्रस्तुत विद्यापीठाच्या महाविद्यालयाच्या खाजगी कामासाठी | इतर विद्यापीठांच्या कार्यालयीन कामासाठी | इतर विद्यापीठातील संलग्नीत महाविद्यालयांच्या कार्यालयीन कामासाठी | इतर विद्यापीठातील संलग्नीत महाविद्यालयांच्या खाजगी कामासाठी | संशोधक/ इतर विद्यार्थ्यांकरिता | इतर शासकीय कार्यालयांच्या कार्यालयीन कामासाठी | इतर शासकीय कार्यालयांच्या खाजगी कामासाठी | बाहेरील व्यक्ती/ खाजगी संस्था |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | व्ही.आय.पी रुम | रु.१,०००/- | | | | | | | | | रु.१,५००/- |
| २ | एसी रुम | रु.५००/- | | | | | | | | | रु.१,०००/- |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१८(१)] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने विविध न्यायालयातील प्रकरणे पाहण्याकरिता गठीत करण्यात आलेल्या पॅनलमध्ये वकीलांचे नाव समाविष्ठ करण्याबाबतची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: विविध न्यायालयातील न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने कामकाज पाहण्यासाठी वकीलांचे पॅनल गठीत करण्यात आलेले आहे. त्याचा तपशील सोबत जोडण्यात आलेला आहे. तसेच विविध वकीलांकडून प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने कामकाज पाहण्याबाबतची विनंती करण्यात आलेली आहे. सदर वकीलांचा तपशील सोबत जोडलेला आहे.<br>प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने विविध न्यायालयातील न्यायालयीन प्रकरणे पाहण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या पॅनल ॲडव्होकेट यांच्या यादीमध्ये परिशिष्ठ ब मध्ये नमूद विविध वकीलांकडून प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने कामकाज पाहण्यासाठी करण्यात आलेल्या विनंतीनुसार व प्राप्त झालेली नावे विचारात घेऊन त्यांचे नाव पॅनल ॲडव्होकेटच्या यादीमध्ये समाविष्ठ करण्याची बाब विचारार्थ. | कायदा विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने विविध न्यायालयातील प्रकरणे पाहण्याकरिता पॅनेल ॲडव्होकेट म्हणून सर्वानुमते खालीलप्रमाणे नावे निश्चित करण्यात आली.**<br>अ) **मा. उच्च न्यायालय, मुंबई व मा. उच्च न्यायालय, मुंबई चे छत्रपती संभाजीनगर खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर येथील प्रकरणांकरिता पॅनल ॲडव्होकेटचा तपशील.**<br>१. ॲड. श्री. पी. एन. जोशी<br>२. ॲड. श्री. आय. एम. खैरदी<br>३. ॲड. श्री. एस. डी. ठोकडे<br>४. ॲड. श्री. अभिजित कुलकर्णी<br>५. ॲड. सचिन देशमुख<br>६. ॲड. श्री. आनंद चावरे<br>७. ॲड. श्री. रूपेश कुमार सी.<br>८. ॲड. रामदास हाके पाटील<br>९. ॲड. ए. एस. राव<br>१०. ॲड. मंकुवार मिलिंद देशमुख<br>११. ॲड. राजशेखर संगप्पा आळंगे<br>१२. ॲड. अंजली नील हेलेकर<br>१३. ॲड. मनीष केळकर<br>१४. ॲड. असदुल्लाह मो. सलिम शेख<br>१५. ॲड. सागर गणपत तळेकर<br>१६. ॲड. विक्रांत विश्वनाथ फताटे<br>१७. ॲड. प्रशांत चंद्रकांत कांबळे<br>१८. ॲड. उमेश कुरुंद<br>१९. ॲड. प्रतिभा दादासाहेब शेळके<br>२०. ॲड. संजीव कदम<br>२१. ॲड. अविनाथ अघाव<br>२२. ॲड. उदय मालते | |

| | | |
|---|---|---|
| | ब) मे. जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर व सोलापूर येथील इतर न्यायालय व तसेच विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे येथील प्रकरणांकरिता.<br>१. ॲड. श्री. एस. व्ही. उजळंबे<br>२. ॲड. श्री. व्ही. वाय. पांढरे<br>३. ॲड श्री. प्रविण शेंडे<br>४. ॲड. श्री. निशिकांत देगावकर<br>५. ॲड. श्री. निलेश ठोकडे<br>६. ॲड. श्री. संतोष न्हावकर<br>७. ॲड. बसवराज एस. सलगर<br>८. ॲड. सुनिल रामचंद्र बनसोडे<br>९. ॲड. अमोल शिवानंद कळके<br>१०. ॲड. पांडुरंग लक्ष्मीकांत देशमुख<br>११. ॲड. गवई लक्ष्मीकांत अनंतराव<br>१२. ॲड. सचिन राजेंद्र लोमटे<br>१३. ॲड. विजय आर. देशपांडे<br>१४. ॲड. श्रेयांक सुरेशबाबू मंकणी<br>१५. ॲड. लक्ष्मण बाळासाहेब पाटील<br>१६. ॲड. आकाश देठे<br>१७. ॲड. सुचिता रामचंद्र ईवरे<br>१) प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने विविध न्यायालयातील प्रकरणे पाहण्याकरिता गठीत करण्यात वरील ॲडव्होकेट पॅनलमध्ये नवीन वकीलांची नावे समाविष्ट करण्याबाबतचे अधिकार मा. कुलगुरुमहोदयांना देण्यात आले.<br>२) वरीलप्रमाणे गठीत करण्यात आलेल्या पॅनलची मुदत तीन वर्ष राहील. तदनंतर पुढील आढावा घेवून पॅनलची मुदत वाढविण्याचे अधिकार मा. कुलगुरुमहोदय यांना देण्यात आले. | |

डॉ. सुशिल कुमार शिंदे यांनी अध्यक्षांच्या परवानगीने खालीलप्रमाणे आयत्या वेळेचा विषय सादर केला.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१८(२)] | CHB प्राध्यापकांना मानधन देण्याची बाब विचारार्थ. | शिक्षक |
| ठराव: | विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये तासिका तत्वावर (CHB) कार्यरत शिक्षकांना मानधनाचे दर सुधारित करण्यासंदर्भात महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : अर्थसं-२०२२/प्र.क्र.१०५/(१)/मशि-३, दि.२७ मार्च, २०२३ नुसार परिपत्रक निर्गमित करावे असे सर्वानुमते ठरले. | मान्यता विभाग |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद